# ‘भारत - नव्या महासत्तेचा उदय’

**प्रस्तावना**

‘**ब्रँड इंडिया**’ : भारत-सन्मान मुद्रा !

गेल्या ५ वर्षातील अटलबिहारी वाजपेयी यांचे वाजपेयी यांचे नेतृत्व संपूर्ण विकास तत्वास अनुसरुन दिशादर्शक असे खंबीर नेतृत्व होते. हया विकास वर्षामध्ये भारताला ‘सन्मान मुद्रा’ म्हणून नावलौकिक मिळाला आहे. १९९० मधील दिवाळखोरीच्या काळामध्ये देशाचे सोने परदेशात गहाण ठेवावे लागले होते. आज १०० शतकोटी अमेरिकन डॉलरची गंगाजळी हाती असणे ही आपल्या प्रगतीचीच नांदी आहे. या पुस्तिकेमध्ये विकासाचा सारा प्रवास मी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्थिर समर्थ आणि सक्षम**

**अटलजींच्या नेतृत्वात स्थैर्य, सामर्थ्य आणि स्वच्छ दृष्टीकोन आहे. भविष्यातील विकसित भारताची स्पष्ट आरेखने तयार आहेत. तुलनेने अविकसित वर्गाच्या तसेच शेतीसह व्यवसायातील तंत्राचा विकास झालेला आहे. हया प्रगतीमुळेच ‘फिल गुड फॅक्टर’ चे वारे देशभर वाहते आहे.**

- पोलाद उत्पादन आणि वापर ३५% वाढ.
- २००२-०३ या आर्थिक वर्षात १०० भारतीय कंपन्यांनी ७०,००० कोटी रु.ची निर्यात.
- १९ भारतीय उद्योगांनी ५०,००० कोटी रु.च्या विकास योजना कार्यान्वित केल्या
- २००३ मध्ये अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ५.२% इतके रुपयाचे मुल्य वाढले.
- पोलादाची निर्यात.
- विकासाचा सध्याचा ८ टक्के दर दुहेरी आकडयात पोचावा यासाठी राजकीय स्थैर्य, स्वच्छ विचार व स्पच्छ दृष्टी दिली.
- गोल्डमन सॅच या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेच्या अहवालात २०५० मध्ये भारत जगातील क्रमांक तीनची अर्थसत्ता असेल असे म्हटले आहे.
- डी एस पी मेरिडा मिंच या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेच्या अहवालानुसार चालू दशका अखेरीपर्यंत भारताचा विकासाचा दर सध्याच्या दुप्पट होईल. इटली, जर्मन, फ्रान्स व जपान या विकसित देशांच्या पुढे भारत असेल.
- आयटी तंत्रज्ञ, डॉक्टर, अभियंते, व्यावसायिक तरुण उद्योजक ही भारताची शक्ती आहे.
- ही उसळती मानवी साधन संपत्ती भारताला जगाची पुढची महासत्ता बनवणार आहे.
- भारत जगातील आर्थिक महासत्ता बनणार आहे.

एका अर्थतज्ञाने म्हटले त्याप्रमाणे,

१९ वे शतक इंग्लंडचे होते कारण त्यांची नैसर्गिक संपत्ती अमाप होती.
२० वे शतक अमेरिकेचे होते कारण त्यांची भौतिक संपत्ती अमाप होती.
**२१ वे शतक भारताचे राहील कारण आपली मानवी संपत्ती अमाप आहे.**

**पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यांच शब्दात**
**“आओ मिलकर हाथ बढाए**
**भारत वर्ष को महान बनाए”**

**-किरीट सोमैया**
• भाजपा संसदीय पक्षाचे प्रतोद
• सार्व लेखा व वित्त समित्यांचे सदस्य

* * *

माहिती येथून घेतली आहे : आर्थिक क्रांती/रिजर्व बँक/संसदेतील दस्तऐवज/संसदीय समितांचे अहवाल/केंद्रीय सांख्यिकी संस्था/वृत्तपत्रे

## नव्या वर्षाचे विकासाच्या सळसळत्या दराने स्वागत

२००३-०४ आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीमधील विकासाचे आकडे अत्यंत लक्षणीय. -केंद्रीय सांख्यिकी संस्थेनुसार

- शेती विकास दर ७.४ %
- उत्पादन क्षेत्र - ७.३%
- सेवा क्षेत्र - हॉटेल, व्यापार, ट्रॉन्सपोर्ट आणि संचार यातील विकासाचा दर - १०.७%
- विकास दरातील तेजीत चीनपाठोपाठ भारत.
- जगाचा ठोकळ उत्पन्न वाढीचा दर ३ % च्या आसपासच घोंघावत असताना भारताचा ठोस दर मात्र ८% झाला आहे.
- भारताचे ठोक उत्पन्न १९९८ मध्ये १३ लाख ९० हजार १४८ कोटी होते तेच २००३ मध्ये २२ लाख ३६ हजार १२८ कोटी रु. एवढे झाले.




India comes a close second with 8.4 per cent to China in the second quarter of 2003-04, i.e. July to September. Argentinia and Russia are the only other economies with 7 per cent plus growth. Most southest Asian economies are growing in the 3-4 per cent range

* * *

## पायाभूत सुविधांमध्ये अभूतपूर्ण विकास

**देशाच्या भविष्यामध्ये पायाभूत सुविधांच्या विकासाचा मोठाच वाटा असतो.**

- प्रवास, संपर्क, रेल्वे, बंदर या सुविधांसाठी रालोआ सरकारचे खास लक्ष. ५६ वर्षात लक्षणीय प्रगती.
- मुख्य पायाभूत उद्योग म्हणजेच वीज निर्मिती, कोळसा, पोलाद, कच्चे तेल, सिमेंट.
- गतवर्षी १.०२ कोटी नवीन दूरध्वनी जोडण्या.
- २१७४ नवीन राष्ट्रीय महामार्ग बांधून झाले.
- रेल्वे वाहतुकीत ७.५% एवढी वाढ झाली. मोठया बंदरातील वाहतुकीत ६.६% वाढ.
- २००२ या वर्षात सिमेंट व पोलाद उद्योगात ९.३% व ७.३% अशी विक्रमी वाढ झाली.
- राष्ट्रीय महामार्ग विकास योजनेत सध्या दररोज २.५ लाख मजुरांना तर दर हजार पर्यपेक्षकांना रोजगार मिळतो आहे.
- पायाभूत सुविधा रस्ते बांधणीसाठी ५० हजार कोटी रु.तरतूद
- स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या वर्षात ५५६ नवे महामार्ग बांधले गेले होते.
- सुरुवातीच्या ५० वर्षात दर वर्षी ११ किमी लांबीचे रस्ते होते. तर आता दररोज ११ किमी लांबीचे रस्ते.
- ५० हजार कोटी रु. मंजूर झाल्यामुळे पाच वर्षात १४,५५६ किमी रस्ते.
- रस्ते व महामार्ग विकासासाठी स्वतंत्र मंत्रालय
- सुवर्ण चतुष्कोन-पंतप्रधानांचा स्वप्न प्रकल्प असून त्यात दिल्ली-मुंबई, कलकत्ता व चेन्नई ही चार महानगरे ५८४६ किमी च्या महामार्गाने जोडली जातील. २००४ मध्ये हा प्रकल्प पूर्णत्वास जात आहे. पूर्व-पश्चिम स्लिचर ते पोरबंदर आणि उत्तर-दक्षिण श्रीनगर ते कन्याकुमारी हे दोन महामार्ग डिसेंबर २००७ पर्यंत पूर्णत्वास जातील.
- या सुवर्ण चतुष्कोनाच्या पूर्ततेमुळे दर साल ८,००० कोटी रु. चे इंधन वाचणार आहे.
- सडकांनी ३ वर्षात जोडणे हे उदिष्ट ठेवून २००० मध्ये ६० हजार रस्त्यांची कामे सुरु करण्यात आली.
- पाचशे ते हजार लोकसंख्येची खेडी दहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत म्हणजे इ.स. २००७ पर्यंत जोडली जाणार आहेत.

खालील तक्त्यात काही राज्यांत अंमलात आणि उपयोगात आणलेल्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निधीची आकडेवारी दाखवली आहे.

रुपये कोटीत

| क्रमांक | राज्य | २०००-२००१ २००१-०२ व २००२-२००३ तरतूद केलेली रक्कम | प्रत्यक्ष दिलेली रक्कम | सप्टेंबर पर्यंतच्या खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | आंध्रप्रदेश | ५७०.०० | ६३८.९४ | ६१९.७० |
| २ | अरुणाचल प्रदेश | १०५.०० | १२७.४६ | १०७.५३ |
| ३ | बिहार | ४५०.०० | १४९.९० | १०२.२३ |
| ४ | महाराष्ट्र | ३९०.०० | ३७९.२९ | २५५.८६ |
| ५ | तामिळनाडू | २४०.०० | २६८.१४ | २२१.१० |




* * *

## २००३ मध्ये डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य वाढले

- १९४७ पासून सातत्याने डॉलरच्या तुलनेत रुपयाचे सातत्याने अवमूल्यन होत होते.
- १९९१ मध्ये एक अमेरिकरन डॉलरसाठी १९ रु. द्यावे लागे. प्रतिवर्षी रुपयाचे २-३% अवमूल्यन.
- २००३ मध्ये रुपया किमंत ५.२४% ने वधारला.
- ३१ डिसेंबर २००२ रोजी १ डॉलर = ४७.९८ रु. होते तर ३१ डिसेंबर २००३ रोजी १ डॉलर = ४५.५९ रु. झाले.

अमेरिकन डॉलर विरुद्ध भारतीय रुपया




१९५१ मध्ये - १ डॉलर = ४.७६ रु. (रुपया विरुद्ध डॉलर्स)

# भाजप व एनडीए सरकारने विविध क्षेत्रातील प्रगतीसाठी दिलेले महत्व












# परकीय चलन गंगाजळी

**१०० बिलियन डॉलर १०० अब्ज डॉलर**

- भारताच्या गंगाजळीत १०० बिलियन (१०० अब्ज डॉलर) इतकी रक्कम आहे. रुपयात ही रक्कम ४ लाख ६० हजार कोटी. कमकुवत अर्थव्यवस्था ते परकीय चलन गंगाजळीत चौथा क्रमांक इतकी प्रगती.
- चंद्रशेखर पंतप्रधान होते तेव्हा १९९० मध्ये आपल्याला बँक ऑफ इंग्लंड कडे सोने तारण ठेवावे लागले होते. १.२ अब्ज डॉलर एवढेच परकीय चलन १९९१ मध्ये होते.
- नेहरु-गांधी नेतृत्वात परकीय गंगाजळी जास्तीत जास्त ३.९ अब्ज डॉलर होती तर १९५० मध्ये हा आकडा २.१ अब्ज डॉलर इतका होता.

(अमेरिकन डॉलर बिलियन)

| वर्ष | रक्कम |
|---|---|
| १९५०-१९५१ | २,१६१ |
| १९६९-१९७० | १,०९४ |
| १९८९-१९९० | ३,९६२ |
| १९९८ | २९,३६७ |
| २०००-२००१ | ५४,१०६ |
| डिसेंबर २००२ | ७०,४४५ |
| डिसेंबर २००३ | १,००,५०० |




भारताबरोबरच काही विकसित देशांच्या परकीय चलन/गंगाजळी दर्शवणारा तक्ता

| देशाचे नाव | परकीय चलन |
|---|---|
| जपान | ६४४.४ |
| चीन | ४०० |
| तैवान | १९६.६ |
| दक्षिण कोरिया | १५०.३ |
| भारत | १००.०५ |
| | (अमेरिकन डॉलर्स बिलियन) |

* * *

# भारताचा मानवी संसाधन विकास

भारतात १२ लाख व्यावसायिक, अभियंते, तंत्रज्ञ असल्यामुळे आपला देश जगातील महत्वाचे केंद्र बनत आहे.

  - अभियंते - तंत्रज्ञ - ६ लाख, डॉक्टर - २.५ लाख
  - पदवीधर - ७५ लाख

- अशा प्रकारची मानवी संपत्ती, साधन सामुग्री असणाऱ्या भारताकडे मोठया कंपन्यांचा कल.
- जगातील टॉपच्या 'फॉर्च्युन ५००' कंपन्यापैकी १०० बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात संशोधन व विकास कार्यालये सुरु.
- महा संगणक बनवणाऱ्या ३ राष्ट्रात, संचार उपग्रह सोडणाऱ्या ५ राष्ट्रात आपण आहोत.
- भारतीय बुद्धी आणि अमेरिकन कंपन्यांचा मिलाप **इतिहासातील अद्वितीय** बिझनेस विकचा उल्लेख.
- भारत एक सन्मान मुद्रा (ब्रँड) बनलेली आहे.

* * *

## माहिती तंत्रज्ञान - भारत एक महासत्ता

- माहिती तंत्रज्ञान निर्यात १९९८ मधील रु.१०८४० कोटीपासून २००३ मध्ये रु.४५५०० पर्यंत वाढली.
- सॉफ्टवेअर निर्यात १९९७-९८ मध्ये रु.६५०० कोटी होती ती २००२ मध्ये रु.४०,००० कोटी रुपयांच्या वर गेली. २००३ च्या अखेरपर्यंत ती रु.६०,००० कोटी गेली.
- येणाऱ्या वर्षातच सर्वाधिक निर्यात माहिती तंत्रज्ञानाची.
- २००४-०५ पर्यंत माहिती तंत्रज्ञान निर्यातीपासून मिळणारी रक्कम रु.१,००,००० कोटी होईल.
- सध्या एकूण निर्यातीच्या २०% माहिती तंत्रज्ञानाची निर्यात आहे.
- २००७ पर्यंत भारताचे माहिती तंत्रज्ञान १० लाख लोकांना नोकऱ्या पुरवू शकेल.
- सिलिकॉन व्हॅलीमधील सुमारे एक तृतीयांश सॉफ्टवेअर इंजिनियर भारतीय आहेत.
- आय.बी.एम., मॉयक्रोसॉफ्ट, एचपी यांसारख्या उच्च दर्जाच्या माहिती तंत्रज्ञान बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात संशोधन व विकास केंद्रे.

* * *

## दूरसंचार क्रांती

दूरसंचार क्षेत्रातील विकासास 'क्रांती' हाच शब्द योग्य आहे.

- काही वर्षापूर्वी नवीन दूरध्वनीसाठी २ ते ५ वर्षे थांबावे लागे.
- आता त्वरीत दूरध्वनी जोडण्या मिळतात.
- मुंबई-दिल्ली एस.टी.डी. साठी १.९९ रु. प्रति मिनिट इतके दर खाली आले.
- टेलिफोन कंपन्यांमध्ये निवडीचे स्वातंत्र्य ग्राहकाला.
- मोबाईल धारकांची संख्या २००३ मध्ये २.८५ कोटी इतकी झाली.
- इंटरनेट वापरणाऱ्या लोकांची संख्या २००३ मध्ये १.७० कोटी इतकी झाली.

**दूरसंचारचा विकासाचा तक्ता**

| वर्ष | दिलेल्या जोडण्या | प्रतिक्षा यादी |
|---|---|---|
| पहिली योजना (१९५१-५६) | १.७३ | ० |
| १९६६-६९ | ८.१४ | ० |
| सहावी योजना (१९८०-८५) | २८.९५ | ८.४२ |
| सातवी योजना (१९८५-९०) | ४५.८९ | १७.१३ |
| आठवी योजना (१९९२-९७) | १४४.३० | २०.०७ |
| ३१-३-२००३ रोजी | ७००.०० | ० |

**मोबाईल संख्या**

| वर्ष | मोबाईल संख्या |
|---|---|
| १९९६ | १.०० |
| १९९६ | ३.०० |
| १९९७ | ७.९४ |
| २००२ | १०४.८० |
| २००३ | २८५.०० |

* * *

# उत्पादन क्षेत्रातील क्रांती

**२००४ मध्ये ५० हजार कोटी रु. चे विस्तार/विकास प्रकल्प**

- भारतीय उद्योगांच्या आव्हाने पेलण्याच्या क्षमतेत वाढ.
- उत्पादन क्षेत्रात उत्साह. पोलादाची चीनला निर्यात. औषधांची युरोप व अमेरिकस निर्यात. भारतीय बनावटीच्या मोटारींच्या सुटया भागास जागतिक बाजारपेठ. निर्यातीमधून १०० भारतीय कंपन्यांनी ७० हजार कोटी रु. कमावले.
- उत्पादन क्षेत्रातील विकासाचा दर ७% एवढा आहे. २००३-०४ च्या दुसऱ्या तिमाहीत हा दर ७.३% वाढला. उत्पादन क्षेत्रात आत्मविश्वास, विकास योजना वाढल्या.
- मोटार उद्योग, धातू क्षेत्र, औषध उद्योग, पेट्रोकेमिकल आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात विकास भारतीय उद्योग गृहांची ५० हजार कोटींची गुंतवणूक-वाढ-विस्तार प्रकल्प.
- स्थापित क्षमतेच्या ९९% उत्पादन अवजड सिमेंटमध्ये ८६.४%, पोलाद क्षेत्रात ८८% आणि ॲल्युमिनियम ९५% प्रमाणे उत्पादन.

**२००४ मधील विस्तार योजना**

(रु.कोटीत)

| क्रमांक | कंपनीचे नाव | गुंतवूणक अपेक्षित | क्रमांक | कंपनीचे नाव | गुंतवूणक अपेक्षित |
|---|---|---|---|---|---|
| १ | आयओसी | २५,००० | १० | जिंदाल पॉलिस्टर | ६०० |
| २ | बीएसईएस लि. | ३,००० | ११ | फिनोलेक्स इंडस्ट्रीज | ५०० |
| ३ | नाल्को | ३,००० | १२ | शॉ वॉलेस | ५०० |
| ४ | टाटा स्टील | १,७०० | १३ | ईस्पात | ८९० |
| ५ | टाटा केमिकल्स | १,२०० | १४ | जिंदाल स्टील | ६०० |
| ६ | हुंदाई | १,१०० | १५ | आयएसपीएल | ५५० |
| ७ | बाल्को | १,००० | १६ | मोझर बियर | ५०० |
| ८ | इंडो रामा | १,००० | १७ | इतर | ७६६० |
| ९ | एलजी इलेक्ट्रॉनिक्स | १,२०० | | | |
| **एकूण = ५०,०००** | | | | | |

* * *

# महत्वाच्या मूलभूत उद्योगातील वाढ

**सिमेंट व पोलाद उत्पादनातील क्रांती :**

- सिमेंटच्या खपामध्ये ३५% वाढ.
- प्रत्येक देशाचा विकास त्या देशातील सिमेंट आणि पोलादाच्या खपाशी निगडीत.
- येणाऱ्या वर्षांमध्ये भारतातील सिमेंटचे उत्पादन आणि खप दुपटीने वाढेल. १९९५-९६ मध्ये ६९.६३ मे.ट. असलेले सिमेंटचे उत्पादन २००४ मध्ये १३८ मे. ट. होईल.
- २००१ मध्ये ३१.५० लक्ष टन, २००१ मध्ये ३३.८० टन आणि २००२-०३ मध्ये ३४.७० लक्ष सिमेंटची निर्यात केली गेली.




* * *

## पोलाद : उत्पादन, वापर आणि निर्यात-एक नवीन दिशा

- पायाभूत सुविधा उद्योग आणि गृहनिर्माण क्षेत्राचा विकास, पोलाद उद्योगाला नवसंजीवनी.
- पोलाद उद्योगाने पुनरुज्जीवनाचा नवा मार्ग दाखवला एवढंच नव्हे तर इतिहासात प्रथमच २००३ मध्ये आपण पोलादाची निर्यात केली.
- २००३ मध्ये पोलादाची निर्यात ती ऐतिहासिक घटना.
- पोलादाची चीन आणि इतर देशांना निर्यात.
- पोलादाचे ५ वर्षातील उत्पादन.




- पोलादाची वर्ष २००२-०३ मधील आणि २००३ च्या एप्रिल-जुलै या काळातील निर्यात

| २००२-०३ | | एप्रिल-जुलै २००३ | |
|---|---|---|---|
| उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य |
| ४७१४ | ८७०४ | १६०५ | ३३५६ |

- सध्या पोलादाची निर्यात चीन, अमेरिका, अरबस्तान, बांगला देश व इतर आशिया व युरोपियन देशांना केली जाते.

* * *

## औषध उद्योग - जैव तंत्रज्ञान : नवी शिखरे

- औषधांची निर्यात १२,००० कोटी रुपये.
- 'सन्मान चिन्ह' भारतासाठी औषध आणि जैव तंत्रज्ञान उद्योगांनी नवीन क्षितिज खुले केले आहे.
- १९९७-९८ च्या दरम्यान जागतिक व्यापार संघटना पेटंट, गॅट करार, ट्रीप आदीमुळे भारतीय उद्योग जगत तसेच समाजामध्ये गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.
- केंद्र शासनाच्या स्पष्ट धोरणामुळे आणि स्थैर्यामुळे भारतीय औषध कंपन्यांची प्रगती.
- एच.आय.व्ही., एड्स क्षेत्रात भारतीय कंपन्यांचा विकास, बिल गेट्स यांच्या ग्लोबल फाऊंडेशनने चार भारतीय औषध कंपन्यांबरोबर सामंजस्य करार केले असून एड्स प्रतिबंधक औषधे जगभर पुरविण्याचे काम या कंपन्या करणार आहेत.
- अन्य राष्ट्रांमधून उत्पादन काढून घेण्याच्या (आऊटसोर्सिंग) प्रगत राष्ट्रांच्या भूमिकेचा लाभ भारतीय औषध उद्योग उठवत आहे.
- भारताने औषध उद्योगातील व्याख्या बदलून टाकल्या असून स्वस्त औषधे जगाला पुरवित आहे.

***

# शेतीचा नवा चेहरा

**कृषीक्षेत्रासाठी २,७२,००० कोटी रुपये**

**कृषी क्षेत्राचे महात्म्य आणि त्याला मान्यता**

- स्वस्त आणि सुलभ कृषी कर्ज उपलब्ध्
- शेतकऱ्यांना १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला आकारला जाणारा १४% व्याजदर २००३ च्या अखेरीपर्यंत ९% इतका खाली आणण्यात आला.
- विविध राज्यांमध्ये विशेषतः आदिवासी व दुष्काळ प्रवण विभागात साडे आठ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी ५८०० कोटी रुपयांची गुंतवणूक.
- १४ राज्यांमध्ये २८ शेतमाल निर्यात क्षेत्रे स्थापण्यात त्यात ७८१ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येत आहे.
- इंदिरा गांधीच्या कार्यकाळात कृषी क्षेत्राला ३४,३९७ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध.
- अटलजी २,७१,९५० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

पुढील तक्ता कृषी-वित्तमधील वाढ दर्शवितो.

| सरकार | वर्ष | मंजूर कृषी कर्ज |
|---|---|---|
| इंदिरा गांधी | १९८०-८४ | ३४,३९७ |
| राजीव गांधी | १९८४-८९ | ५७,८७२ |
| व्ही.पी.सिंग-चंद्रशेखर | १९८९-९१ | ४३,५२० |
| पी.व्ही.नरसिंहराव | १९९१-९६ | १,७२,२१९ |
| तिसरी आघाडी | १९९६-९८ | ९९,७६८ |
| वाजपेयी | १९९८-२००३ | २,७१,९५० |

**थकीत कृषी कर्ज**

| मार्च अखेरीस | सार्वजनिक क्षेत्रातील बँका | | खाजगी बँका | |
|---|---|---|---|---|
| | थकीत कर्ज | एकूण बँक कर्जाशी प्रमाण % | थकीत कर्ज | एकूण बँक कर्जाशी प्रमाण % |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १९९८ | ३४३०४ | १५.७ | २७४६ | ९ |
| १९९९ | ४००७८ | १६.३ | ३२८६ | ९ |
| २००० | ४६१९० | १५.८ | ४४८१ | ९ |
| २००१ | ५३६८५ | १५.७ | ५६८१ | ९ |
| २००२ | ६३०८३ | १५.८ | ५४०६ | ९ |
| २००३ | ७३८७४ | १५.५ | ८५७७ | १० |

* * *

## किसान क्रेडिट कार्ड

- गेल्या ५ वर्षात शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड देण्याची कल्पना अंमलात आणली गेली.
- कृषी क्षेत्र महत्वाचे औद्योगिक क्षेत्र म्हणून.
- १९९९-२००० मध्ये किसान क्रेडिट कार्डाची उपलब्धता.
- ३,४१,३४,५१७ शेतकऱ्यांना ३० सप्टेंबर २००३ पर्यंत किसान क्रेडिट कार्ड पुरवण्यात आली.
- नाबार्डच्या माहितीप्रमाणे ३० सप्टेंबर २००३ पर्यंत ८२,८२५ कोटी रुपये शेतकऱ्यांना मंजूर केले.
- आंध्रातील ५७,८१,९५१ कुटुंबांना ९५८१ कोटी रु. व किसान क्रेडिट कार्ड पुरवण्यात आले.
- उत्तर प्रदेशात ६३,८८,४६८ किसान परिवारांना १०८९९ कोटी रु.च्या मंजूरीसकट समाविष्ट केले गेले.




* * *

## प्रत्येकाला हक्काचे घर

### २००८ पर्यंत सर्वांना 'घर'

- दर साल २० लाख घरे, १३ लाख ग्रामीण भागात, ७ लाख शहरी विभागात.
- ग्रामीण आवास योजनांची पुनर्रचना
  - प्रधानमंत्री ग्रामोदय योजना
  - ग्रामीण आवास योजना
  - इंदिरा आवास योजना

अशा त्या योजना आहेत.

- गेल्या ५ वर्षात हुडकोने १२ हजार कोटी रु. चे वाटप आहे.

### शहरी गरिबांसाठी घरांच्या योजना

- शहरांतील झोपडपट्टयामध्ये राहण्याऱ्या गरीबांच्या प्रश्नांत लक्ष घालण्यात आले असून त्यादृष्टीने उपाययोजना सुरु झाल्या आहेत.
- २०००-०१ वर्षात रालोआची वाल्मिकी आंबेडकर आवास योजना.
- शहरी गरीबांना मोफत घरे देण्यासाठी तसेच त्यांच्या वस्त्यांमध्ये स्वच्छता गृह बांधण्यासाठी २००० कोटी रु. चे अर्थसहाय मंजूर.
- या योजनेच्या पहिल्या टप्प्यात शहरी भागातील गरीब कुटुंबाना १ लाख मोफत घरे व घरांसाठी प्रत्येकी ६० हजार रु. अनुदान.
- दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या २५ लाख गरीब झोपडपट्टीवासियांना मोफत घरे.

* * *

## गृहनिर्माण कर्जाचे वाटप - जागतिक उच्चांक

गृहकर्जासाठी व्याजाचे दर १७% वरुन ७.५% पर्यंत घसरले. आपले गृहनिर्माण कर्जाचे वाटप जगातील अद्वितीय असे आहे. इंदिरा गांधीच्या काळात (१९८०-८४) एकूण फक्त ३८९ कोटी रु.चे कर्ज वाटप या क्षेत्रासाठी झाले होते ते अटलजींच्या रालोआ सरकारच्या काळात (१९९८-२००३) १ लाख कोटी रु. एवढे झाले.

- पुढील तक्ता गृहनिर्माण कर्जाचा विकास दर्शवितो

रु. कोटीत

| सरकार/वर्ष | रक्कम |
|---|---|
| इंदिरा गांधी (१९८०) | ३८९ |
| राजीव गांधी (१९८४-८९) | १,०६२ |
| व्ही.पी.सिंग-चंद्रशेखर (१९८९-९१) | १,४१७ |
| नरसिंहराव (१९९१-९६) | ६,१६२ |
| तिसरी आघाडी (१९९६-९८) | ५,७७३ |
| रालोआ (१९९८-२००३) | १,००,००० |




- लहान-मोठ्या शहरात गृहकर्ज रचना सुलभ झाल्यामुळे तिशीतले तरुण नवी घरे घेत आहेत. २००३ च्या अखेरीस गृहकर्जाचा प्रत्येक लाखासाठी दरमय हप्ता ७७५ रु. असा झाला आहे. गृहनिर्माण क्षेत्रामुळे सर्वसाधारण अर्थव्यवस्थेसाठी गती प्राप्त होते. म्हणजेच पोलाद, सिमेंटचा जादा खप, जादा रोजगारनिर्मिती.

* * *

## क्रयशक्ती वाढली - राहणीमान उंचावले

वाढत्या स्पर्धेमुळे ग्राहक हिताची जाण वाढली, संशोधन व विकास झाला त्यामुळे विविध उत्पादनांच्या किमंती खाली आल्या.

- देशातील १५ कोटी कुटुंबे, पर्यायाने लोकसंख्येतील ७५% लोक आज **मध्यमवर्गीय** या व्याख्येत येतात.
- ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी कर्जावरील व्याजाचे दर १९९७-९८ मध्ये १९% होते ते आज २००३ मध्ये ८% एवढे खाली आले आहेत.
- किरकोळ कर्जाचा आकडा १९९८ मध्ये २३ हजार कोटी रु. एवढा होता तो २००३ मध्ये १ लाख २५ हजार २०० कोटी रु. असा वाढला. २००४ मध्ये तो १ लाख ६६ हजार कोटी रु. एवढा राहील असा अंदाज आहे.

(रु. कोटीत)

| वर्ष | किरकोळ कर्ज रक्कम |
|---|---|
| १९९१ | ७,२०० |
| १९९६ | १४,००० |
| १९९८ | २३,००० |
| १९९९ | ४२,००० |
| २००३ | १,२५,००० |
| २००३ | १,६६,००० |




**किरकोळ कर्ज = एक क्रांती**

## अन्य क्षेत्रातील विकास

भारताची घोडदौड सर्वत्र सुरुच आहे

- वृत्तपंत्राचा खप २००२-०३ मध्ये २४% वाढला.
- २००१-०२ मध्ये देशातील सर्व वृत्तपंत्राचा खप ११.५३ कोटी प्रती एवढा होता.
- २००२-०३ मध्ये हा खप १४.२ कोटी प्रती एवढा झाला. आधीच्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ २४% एवढी आहे.
- अंत्योदय अन्न योजना ही जगातील सर्वात मोठी अन्न सुरक्षा योजना असून १५०० कोटी रु. खर्चून १.५ कोटी कुटुंबाना या योजनेत धान्य पुरविण्यात आले.
- स्वस्त धान्य योजनेखाली दर व्यक्तीला १० किलो अन्नधान्य देण्यात येत होते. ते आता ३५ किलो पर्यंत वाढवण्यात आले. दारिद्र्य रेषेखालच्या २६ कोटी लोकांना त्याचा लाभ होणार आहे.
- २००१ साली संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सुरु झाली. दहा हजार कोटी रु. खर्चाची जगातील सर्वात मोठी कामासाठी धान्य अशी ही योजना आहे.
- संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेखाली एप्रिल २००२ ते जानेवारी २००३ दरम्यान दुष्काळी प्रदेशातील जनतेसाठी म्हणून ४७.६३ लाख टन धान्याचे वाटप राज्यांना करण्यात आले.
- एप्रिल १९९९ मध्ये स्वर्णजंयती ग्राम स्वरोजगार योजना सुरु करण्यात आली. यासाठी १२ लाख स्वयं मदत गट काम करत असून स्वयंरोजगार निर्माण करणाऱ्या ३२.४८ लाख लोकांना त्यातून मदत देण्यात येत आहे.
- १६ नवीन जन शताब्दी रेल्वे गाडया सुरु करण्यात आल्या. आधीच्या राजवटीमध्ये १९८६ पासून सर्व मिळून १६५ गाडया चालू झाल्या होत्या.
- २४२९ किमी सीमाभागात कूंपन घालण्यासाठी १३३४ कोटी रु. ची तरतूद करण्यात आली. काम जोरात सुरु आहे.
- वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी २५००० कोटी रु. खर्चाचा वस्त्रोद्योग गिरण्या आधुनिकीकरण निधी उभारण्यात आला आहे.
- वयोवृद्धांचे १.५३ लाखाचे वार्षिक उत्पन्न करांमधून पूर्णपणाने वगळण्यात आले आहे.
- ५५ वर्षांवरील व्यक्ती दरमहा उत्पन्न देणारी आज ९% दराची हमी देणारी 'वरिष्ठ विमा योजना' सुरु करण्यात आली. यात वयस्क नागरिकांनी डिसेंबर २००३ पर्यंत ४५०० कोटी रु. गुंतवले आहेत. ३ लाख विमा पॉलिसी वरिष्ठ विमा योजनेसाठी काढण्यात आल्या आहेत.

* * *

## परदेशी कर्जाची परतफेड

- आपण इतिहासात प्रथमच मुदतीच्या आधी कर्जाची फेड करु लागलो आहोत.
- २००३ मधील जबरदस्त परकीय चलन गंगाजळीच्या मुदतीमुळे भारताने उच्च व्याजदाराचे परकीय कर्ज परत करुन कमी व्याज दराचे कर्ज उचलण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.
- २००२-०३ हे वर्ष ऐतिहासिक म्हणून नोंदले जाईल कारण परदेशाकडून आलेल्या रकमा १३२८५ कोटी रुपये होत्या.
- २००२-०३ मध्ये आपण परत केलेल्या रकमा २४२८६ कोटी रुपये होत्या.
- या रकमेत एडीबी, आयबीआरडी, फ्रॉन्स इत्यादीच्या उच्च व्याज दराच्या कर्जाच्या मुदतपूर्व परतफेडीपोटी दिलेले रुपये १४६६९ कोटी रुपये समाविष्ट आहेत.
- ३ अब्ज डॉलर्सच्या कर्जाची मुदतपूर्व परतफेड

* * *

## राज्यांच्या अर्थकारणास हातभार

**राज्यांचे १,००,००० कोटी रुपये वाचवले**

- १४ ते १७ % एवढया व्याजाची कर्जे असणाऱ्या राज्यांना कमी व्याजदराची कर्जे उचलण्यासाठी आर्थिक मदत करण्यात आली. ७ ते ९ % एवढया कमी व्याजदराने राज्यांना पैसा उपलब्ध. कर्जाची पुनर्रचना २००३-२००४ च्या पहिल्या सहामाहीत ३,२६,००० कोटी रुपयांची कर्जे रुपांतरीत करण्यात. दरसाल राज्य सरकारचे ६ ते ८% व्याजाचे पैसे वाचल्यामुळेच १,००,००० कोटी रुपयांची राज्य सरकारची बचत.

* * *

## सेवा क्षेत्रातील उत्साह (बीपीओ)

**जगाचे काम भारतातून करणे**

भारतात बसून आपले तंत्रज्ञ, अभियंते, तरुण उद्योजक जगातील सर्व देशांमध्ये काम करीत आहेत. जगासाठी कंपनी काम, त्यांच्या सूचना आणि मागण्यांचे तंत्रज्ञ जाब-जबाब देणे असे सारे काम इथे बसून पार पाडले जात आहे.

- विमा क्षेत्र : काम प्रक्रिया पार पाडणे, कॉल सेंटर
- बँकिंग व फायनान्स : कर्जांची प्रकरणे हाताळणे, कॉल सेंटर
- विमान कंपन्या : करसूची जमाखर्च, कॉल सेंटर
- मोटार उद्योग : तांत्रिकी काम, रेखाकंन, लेखा
- भारतातील बीपीओ क्षेत्राचा विकास ६०% ठोकळ दराने होईल असे अनुमान आहे.
- पुढील तक्त्यात भारताची बीपीओ केंद्रे दर्शवली आहेत.

| शहर | कामाचे मुख्य क्षेत्र | काम करणाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| दिल्ली | कॉल सेंटर, व्यवहार प्रक्रिया, चिप डिझाईन सॉफ्टवेअर | ७३,००० |
| मुंबई | वित्तीस संशोधन, बँक ऑफिस सॉफ्टवेअर | ६२,०५० |
| बंगलोर | चिप डिझाईन, सॉफ्टवेअर, बायो-इन्टरमॉटिक्स<br>कॉल सेंटर, आयटी कन्सलटिंग, टॅक्स प्रोसोसिंग | १,०९,५०० |
| हैद्राबाद | सॉफ्टवेअर, बँक ऑफिस, प्रॉडक्ट डिझाईन | ३६,५०० |
| चेन्नई | सॉफ्टवेअर,व्यवहार प्रक्रिया, ॲनिमेशन | ५१,१०० |
| कलकत्ता | कन्सलटिंग, सॉफ्टवेअर, | ७,३०० |
| पुणे | कॉल सेंटर, चिप डिझाईन, एम्बेडेड सॉफ्टवेअर, | ७,३०० |

* * *

## बिझनेस प्रोसेस आऊट सोर्सिंग (बीपीओ) - एक नवीन क्षितिज

- भारतीय बुद्धीमत्तेमधूनच आऊटसोर्सिंग हे एक नवे क्षितिज खुले झाले आहे.
- २००८ पर्यंत या क्षेत्रामुळे २५०० कोटी अमेरिकन डॉलरचा व्यवसाय आपल्याला मिळेल अशी अपेक्षा आहे.
- २००२-०३ मध्ये परराष्ट्रीय कार्यालयीन/व्यवसायिक कामकाज भारतात करुन घेणाऱ्या या व्यवसायाकडून २५० कोटी डॉलरचा म्हणजेच ११ हजार ३०० कोटी रु. चा व्यवहार झाला होता.
- जगाचे ‘बँक ऑफिस’ आपण बनतो आहे. **बीपीओ** हा आपला नवा मूलमंत्र आहे. जागतिक पातळीवर उद्योग व्यवसायात अग्रणी असणाऱ्या शेकडो कंपन्या आज बीपीओ साठी भारतात गर्दी करत आहेत. डायमडारख्रिसलस, ब्रिटिश टेलीकॉम, बॅरकॅलेस, बान, एचएसबीसी, हनीवेल ही चमचमती यादी सतत वाढतेच आहे. मॅट्रीक सिनेमात पुनःप्रकटण्याचा वेगही त्यापुढे फिका वाटतो अशा गतीने बहुराष्ट्रीय, बडया कंपन्या येथे प्रकट होत आहेत. अमेरिकेतील निवडणूक प्रचारसाठी निधी उभा करण्यासाठी डेमोक्रॅट आणि रिपब्लिकन हे दोन्ही पक्ष त्यांच्या देशातील देणगीदारांना संपर्क साधत आहेत तो भारतीय लोक जेथे काम करतात अशा भारतातील कॉल सेंटरच्याच माध्यमामधून ब्रिटिश रेल चे चौकशी विभागाचे सर्व काम यापुढे बंगलोरला हलवले जाईल अशा शक्यता आहे. जीई, ॲपेक्स, सिटीग्रुप आणि अन्य काही बडे खिलाडी या क्षेत्रात गेले दशकभर भारतातून मोठया प्रमाणात काम करत आहेत. ‘फॉर्च्युन १०००’ यादीमधील एक पंचमांश कंपन्यांकडे आतापर्यत पत्ता भारतीय बीपीओ पत्ता आला आहे. या क्षेत्रात काम करणारे आघाडीचे उद्योजक सांगतात की दर आठवडयात किमान दोन नवीन व्यवसायसंधी परदेशातून प्राप्त होत आहेत.
- भारताकडे किती मोठया प्रमाणात आऊट सोर्सिंग व्यवहार वळू शकतो या बाबत विविध अंदाज जागतिक पातळीवर केले जात आहेत. गार्टनर या सल्लागार कंपनीचा अहवालात हा आकडा १३५० कोटी डॉलर म्हणजे सुमारे ६३ हजार ५०० कोटी रु. असा दिला असून नॉसकॉम-किन्सडो यांच्या अहवालात हा व्यवसाय २१०० ते २४०० कोटी डॉलर (९८ हजार ते १ लाख ३० हजार कोटी रु.) एवढया टप्प्यावर २००८ पर्यंत पोहचेल असे म्हटले आहे.
- बीपीओ मधून पुढील काही वर्षात २५ लाख नोकऱ्या मिळणास असून त्याचा लाभ हप्ते - दरहप्ते सव्वा कोटी लोकांना त्याचा लाभ होईल.
- २००७-०८ पर्यंत ठोकळ उत्पन्न वाढीला दर ७% वर जाण्यासाठी या क्षेत्राचे योगदान मोठे राहील.
- बँक ऑफिस ऑपरेशन, बिझिनेस आणि आऊट सोर्सिंग या क्षेत्रामधून ४०,००० नोकरी संधी निर्माण व्हावेत आणि ६००० कोटी अमेरिकन डॉलर्स म्हणजेच २,७५,००० कोटी रुपयेचा महसूल मिळावा यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

- तंत्रज्ञान संबधांमुळे सुमारे ४०० भारतीय कंपन्यांनी इंग्लंडमध्ये संयुक्त क्षेत्र कंपन्या सुरु केल्या आहेत.

भारताचे बीपीओ माध्यमातून २००३ मधील महसूली उत्पन्न २.५ कोटी डॉलर्स

| जागतिक चित्र | भारतीय क्षमता |
|---|---|
| नॅसकॉम-मॅकीन्सले | २१ ते २४ अब्ज डॉलस २००८ पर्यंत |
| २५० अब्ज डॉलर्स २००६ पर्यंत | ११,००,००० नोकऱ्या |
| गार्टनर : २४.३ अब्ज डॉलर्स २००७ पर्यंत | २००७ पर्यंत १३.८ अमेरिकन डॉलर |
| बीसीसी : १७० अब्ज डॉलर्स २००५ पर्यंत | २५ अमेरिकन डॉलस (कालावधी निश्चित नाही ) |
| फॉरेस्टर रीसर्च : अमेरिकन मॉर्केट | ५८ अमेरिकन डॉलर (४०%) परदेशात जाईल |
| १४६ अब्ज डॉलर्स २००८ पर्यंत | त्यापैकी भारताचा वाटा सिंहाचा राहील. |
| आयडीसी : २००६ पर्यंत ३५० | १४० दशलक्ष परेदशात जाईल |

* * *

## निर्यात-भारताने जगाच्या बाजापेठा काबीज केल्या

- भारताची प्रतिमा जागतिक पातळीवर उंचावली आहे. • नव्या उत्साहाने आणि विश्वासाने भारतीय उद्योजक, कंपन्या आणि सरकार यांनी जागतिक अर्थ व्यवहाराचे आव्हान स्वीकारले आहे • नोव्हेंबर २००१ मध्ये निर्यातवाढीचा दर १.७४%
- २००३ मध्ये एकूण निर्यात २,५०,१३० कोटी रुपये. १९९८ मध्ये हाच आकडा १,३०,१०१ कोटी रुपये एवढा होता.
- बिझनेस प्रोसेर ऑपरेशन (बीपीओ) या क्षेत्रात तसेच उत्पादन क्षेत्रात प्रचंड निर्यात वाढ. भारत एक जागतिक, आर्थिक सत्ता बनण्याचीही सुरुवात. उत्पादन क्षेत्रामध्ये प्रचंड व्यवसाय वृध्दी आहे. पोलादाची चीनला निर्यात झाली आहे. औषधे युरोप व अमेरिकेला जात आहे. मोटारींचे सुटे भाग जगाच्या रस्त्यांवरुन धावत आहेत. २००२-२००३ मध्ये जेव्हा जगात व्यवसायात काहीशी मंदी होती तेव्हा १०० टॉप भारतीय कंपन्यांनी ७०,००० कोटी रुपये निर्यातीमधून मिळवले.
- अन्नधान्येव निर्यात १२.५ अब्ज टन एवढी झाली.
- काही वर्षांपर्यंत भारत वापरलेल्या आणि नव्या मोटारगाडया आयात करत होता. आज मात्र स्थिती उलट झाली आहे. जगातील बहुतेक सर्व मोठया मोटार उत्पादकांनी भारतात कारखाने सुरु केले असून २००१-२००२ मध्ये १,८४,६८० गाडयांची निर्यात झाली तर २००२-२००३ मध्ये त्यात वाढ होऊन ३०५३६८ एवढया मोटार गाडयांची निर्यात झाली.
- २००३-०४ आर्थिक वर्षाच्या पहिल्या भागात म्हणजे एप्रिल ते सप्टेंबर २००३ मध्ये मोटार निर्यातीमध्ये ६८% एवढी वाढ झाली असून या सहामाहीत २२१३१ एवढया मोटर गाडयांची निर्यात झाली आहे.
- भारतीय सुटया भागांच्या उत्पादकांकडून परदेशी मोटार कंपन्या आऊटसोर्सिंग पध्दतीने सुटे भाग घेत आहेत.
- डायम्लर, ख्रिसलर, व्होल्व्हो, बेंझ असे मोटार उद्योगातील अग्रणी भारतातून १.५ अब्ज डॉलर्स (६८०० कोटी) चे सुटे भाग घेत आहेत.
- जीएपी, टॉमी, हिलफिगर, एस्पिरीट, वॉलमार्ट, पोलो अशा कंपन्या भारतातून तयार कपडे उचलत असून सध्या हा आकडा ३०,००० कोटी रुपये एवढा आहे.
- वस्त्रोद्योग निर्यात २०१० पर्यंत ३,००,००० कोटी रुपये पर्यंत जाईल.
- कित्येक वर्ष भारत हा पोलादाचा निव्वळ आयातदार होता. आता आपण पोलादाचीव लक्षणीय निर्यात करतो. २००२-०३ मध्ये तयार पोलादाची निर्यात ३६.८% नी वाढली तर चालू वर्षात त्यात आणखी ३९% भर पडत आहे. एप्रिल-सप्टेंबर २००३ या काळात २६.५० लाख टन पोलादाची निर्यात झाली.
- सिमेंट निर्यातीमध्ये एप्रिल २००३ मध्ये ३०.९% वाढ नोंदली गेली. • २००२-०३ मध्ये कपडयांची निर्यात ९% नी वाढली.
- चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये एकूण निर्यात १२.२% नी वाढलेली दिसली.
- 'चालू खात्यावरील देणे' या निकषानुसार २४ वर्षात प्रथमच भारत उत्तम स्थितीत आहे.

* * *